# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**

**MID-TERM EXAMINATION 2023-24**

**MARATHI**

Class : VII
Duration : **3** Hrs
Date : 11.10.2023
Max. Marks : **80**

Admission No.:
Roll No.:

**General Instructions:**

(1) सूचनेप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहिणे.
(2) खंड – क ,ख, ग, घ नमूद करावेत.
(3) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

**[ खंड क वाचन कौशल्य ]**

**प्र 1 अपठित गदयांश –** **(5)**

शहरातील एका नावाजलेल्या शाळेत मोहन नावाचा हुशार मुलगा शिकत होता. त्याचे आई–वडील दोघेही डॉक्टर होते. त्यामुळे पैशाची कमतरता नव्हती मोहनला त्याच्या श्रीमंतीचा खूप गर्व होता . तो कोणाचीही मदत करत नव्हता एक दिवस बाई एका नवीन विदयार्थ्याला वर्गात घेऊन आल्या त्याचे नाव सुनील होते.नुकतीच सुनीलच्या वडिलांची बदली त्या शहरात झाली होती. बाईंनी मोहनला सुनीलची मदत करायला सांगितले व त्या निघून गेल्या. मात्र वर्गात मोहनने सुनीलची मदत केली नाही.

(क) मुलाचे नाव काय होते ? (रोहन / मोहन / सोहन)
(ख) नवीन विदयार्थ्याला वर्गात कोण घेऊन आले ? (आई / माई / बाई )
(ग) नवीन विदयार्थ्याचे नाव काय होते ? (सुनील / नील / संजय)
(घ) मोहनचे आई–वडील कोण होते ? (वकील / डॉक्टर / शिक्षक )
(ड.) मोहनला कशाचा गर्व होता ? (घराचा / गाडीचा / श्रीमंतीचा )

**प्र 2 अपठित गदयांश –** **(5)**

**ए**कदा एक म्हातारा शेतकरी शेतात काम करत होता. तो आंब्याची झाडे लावत होता. त्या देशाचा राजा भ्रमण करण्यासाठी तेथूनच जात होता. त्यांने शेतक–याला उन्हांत काम करताना पाहिले. राजा त्याच्याजवळ आला व म्हणाला ,काय करत आहात भर दुपारी ? शेतकरी म्हणाला मी आंब्याची रोपे लावत आहे. ते एकून राजाला नवल वाटले राजा म्हणाला शेतकरी बुबा, पण या आंब्याची फळे तुम्हाला खायला मिळणार नाही.फळे खूप वर्षांनी येतात ? त्यावर म्हातारा शेतकरी म्हणाला ,अरे बाबा रे! मी ज्या झाडाची फळे खातो ती मी लावलेली नाहीत. ती माझ्या आजोबाने लावली होती. या झाडाची फळे माझे नातवंड खातील .राजाला हे ऐकून खूप आनंद झाला. त्याने शेतक–याला सोन्याच्या मोहरा बक्षीस म्हणून दिल्या.

प्रश्न–

1शेतकरी कोठे काम करत होता ?
(घरात / गावात / शेतात )

2 राजा कशासाठी जात होता ?
(शिकारीसाठी / भ्रमणासाठी / खेळण्यासाठी )

3 शेतकरी कशाची रोपे लावत होता ?
(आंब्याची / फणसाची / केळीची )

4 शेतकरी खात असलेल्या फळांची झाडे कोणी लावली होती ?
(मामाने / काकाने / आजोबाने )

5 राजाने शेतक–याला काय बक्षीस म्हणून दिले ?
(फळे / पैसे / सोन्याच्या मोहरा )

**खंड ख व्याकरण**

**प्र 3 विरुधार्थी शब्द – ( opposites )** **(2)**

1 जवळ x ( पास / दूर / वर )

2 बाहेर x ( आत / खाली / वरती )

**प्र 4 लिंग बदला – ( change the gender )** **(2)**

1 आजोबा ( नात / आजी / पंनजी )

2 बैल ( बकरी / घोडा / गाय)

**प्रश्न 5 वचन बदला – (write the plural noun )** **(2)**

1 रस्ता ( वार / रस्ते / रास्ते )

2 दरवाजा ( दार / दरवाजो / दरवाजे )

**प्र 6 समानार्थी शब्द लिहा–** **(2)**

1 वारा ( नभ / पंख / पवन )

2 नभ ( आकाश / नदी / राग )

**प्र 7 काळ ओळखा –** **(2)**

1 श्याम पुस्तक वाचत होता.

2 मला रामरक्षेचे पुस्तक देशील.

**प्र 8 खाली प्रत्यय लावून नवीन शब्द बनवा –** **(2)**

1 पुस्तका + खाली

2 झाडा + खाली

**प्र 9 खालील वाक्यातील क्रियापद ओळखा –** **(2)**

1 राम कौतुक करीत म्हणाला.

2 ती आज रडत होती.

**प्र 10 खालील वक्यातील सर्वनाम ओळखा :–** **(2)**

1 आम्ही उदया नगरला जाणार .

2 तुम्ही आमच्या घरी केव्हा येणार.

**खंड ग साहित्य**

**प्र 11 पठित गदयांश –** **(5)**

**ए**के दिवशी भास्कर श्यामला म्हणाला,श्याम! आता माझे दहाच श्लोक राहिले आहेत. आणखी पाच –सहा दिवसांनी माझी सारी रामरक्षा पाठ होईल, तुला कोठे येते ? मी एकदम संतापलो व त्याच्या अंगावर धावून गेलो व ओरडलो ,भाश्या ! पुन्हा येशील तर बघ तुझयाजवळ पुस्तक आहे म्हणून माझयाजवळ असते तर तुझया आधी पाठ केली असती . ही बाचाबाची ऐकून आई बाहेर आली. तिने भास्करला विचारले ,काय रे झाले भास्कर ? श्यामने का तुला मारले का ?

1 कुणाचे दहा श्लोक राहिले आहेत ?

2 पाच–सहा दिवसांनी काय पाठ होणार आहे ?

3 बाचाबाची ऐकून कोण बाहेर आली ?

4 आधी शब्दासाठी विरूध्दार्थी शब्द लिहा ?

5 वरील पाठाचे लेखक कोण आहेत ?

**प्र 12 पठित पदयांश –** **(5)**

अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाला टांगला ।।1।।

पिलं निजले खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाला टांगला ।।2।

1 खोपा कुणाचा आहे ?
2 झोका कोठे टांगला आहे ?
3 खोप्यात कोण निजले आहे ?
4 पक्षीणीचा कोणामधे जीव आहे ?
5 जीव कोठे टांगला आहे ?

**प्र 13 जोडया लावा –** **(4)**

1 गाय – तबेला
2 उंदीर – गुहा
3 वाघ – बीळ
3 घोडा – गोठा

**प्र 14 रिकाम्या जागा भरा –** **(4)**

1 माझी ––– बंद होणार नाही.
2 बाचाबाची ऐकून ––– बाहेर आली.
3 मन्या घरातच ––– मारीत राहिला.
4 कौतुकाने ––– श्यामची वही पाहिली.

**प्रश्न 15 कोण कोणास म्हणाले लिहा –** **(2)**

1 तू माझ्या घरी येशील ?
2 काय झाले भास्कर ?

**प्रश्न 16 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा – ( कोणतेही सात )** **(7x2=14)**

1 निळसर मखमल कशाला म्हणतात ?
2 गवताच्या पात्याने कोणते डूल घातले आहे ?
3 खोप्याला कशाची उपमा दिली आहे ?
4 मन्याची वाणी का नाहीशी झाली ?
5 कोणाला पाहून मन्याला आश्चर्य वाटले ?
6 श्यामने रामरक्षा कशी पाठ केली ?
7 विठ्ठलाने गळयात कशाची माळ घातली आहे ?
8 विठ्ठलाचे दर्शन घेताच संत तुकारामांना कसे वाटते ?
9 आईने श्यामला कोणती शिकवण दिली ?

**प्रश्न 17 आपल्या मनपसंद चॉकलेटसाठी एक आकर्षक जाहीरात तयार करा –** **(5)**

**प्रश्न 18 निबंध लेखन :– ( कोणताही एक )** **(5)**

1 माझी शाळा 2 माझा आवडता खेळ 3 माझा मित्र

**प्र 19 स्वपरिचय लिहा :– ( my self in marathi )** (5)

**प्र 20 :–चित्र वर्णन –** **(5)**



**––––––––––समाप्त––––––––––**